# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१२५** **दिनांक - ३०/०३/२०२४**

## बॉम्ब ठेवुन दादर व कल्याण रेल्वे स्टेशन उडवुन देणार अशी धमकी देणाऱ्या आरोपीतास अटक करण्यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.

दिनांक ३०/०३/२०२४ रोजी ००.०५ वा. चे सुमारास पेल्हार पोलीस ठाणे बिट मार्शल नंबर १ व ३ यांना अनोळखी मोबाईल धारक नंबर ७२४९१७७५९८ या नंबरवरुन डायल ११२ कन्ट्रोल रुम मिरा- भाईदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय, मिरारोड येथे कॉल करुन दादर रेल्वे स्टेशन व कल्याण रेल्वे स्टेशन बॉम्बने उडवुन देण्याची धमकी वजा कॉल प्राप्त झाल्याने सदर कॉलचे गांभीर्य लक्षात घेवुन रात्रपाळीचे अधिकारी अंमलदार तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकास मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे यांनी सुचना देवुन सदर इसमाचा तात्काळ शोध व ताब्यात घेवून पुढील कार्यवाहीबाबत आदेश दिले.

त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अपुर्ण माहितीच्या आधारे सदर इसमाचा पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत बिलालपाडा, धानिवबाग, वनोठापाडा, याठिकाणी शोध घेवुन तांत्रिक व गुप्त बातमीदाराचे मार्फतीने संशयीत इसम नामे विकास उमाशंकर शुक्ला, वय- ३५ वर्षे, रा, रुम नं.०५, ओमसाई चाळ, वनोठापाडा, पेल्हार, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर, मुळ राहणार ग्राम पटखवली, ता.बरसाती, जिल्हा- जोनपुर, राज्य- उत्तरप्रदेश मो.नं. ७२४९१७७५९८ यास वनोठापाडा येथुन ताब्यात घेवुन त्याचेबाबत अधिक चौकशी केली असता त्यानेच सदरचे दोन्ही कॉल करुन स्वत: कडील मोबाईल फोन बंद केला असल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्याने ठाणे व मुंबई कंन्ट्रोलला देखील वर नमुद संदर्भात कॉल केले असल्याचे समजले. सदर इसमाविरुध्द पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर I ३६९/२०२४ भादविस ५०५ (१) (ब), ५०५ (२), १८२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, अप्पर पोलीस आयुक्त, मि.भा.व. वि, श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा. पोलीस निरीक्षक/सोपान पाटील, पोउपनि/तुकाराम भोपळे, सचिन कांबळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं. संजय मासाळ, रवि वानखेडे, किरण आव्हाड, मिथुन मोहिते, राहुल कर्पे, दिलदार शेख, निखिल मंडलिक, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, नितीन सांगळे, शंकर सुळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.